**फिर्याद** **दिनांकः— ०८/११/२०२४**

मी महेश रमेश जुमानी वय — ३९ वर्षे, व्यवसाय — व्यापार (पिठाची गिरणी), रा. मुस्कान पॅलेस रूम नंबर १०१, सेक्शन २५ महावीर हॉस्पिटल रोड, उल्हासनगर ४ जि. ठाणे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद लिहून देतो की, (मो.नं. ९३२३२४६५२६)

मी वर नमुद ठिकाणी माझी आई नामे जयश्री जुमानी वय ६५ वर्षे हीचेसह रहावयास असुन मी उल्हासनगर शहरात पिठाची गिरणी चालविण्याचा व्यवसाय करतो व त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा व माझे परिवाराचा उदरनिर्वाह चालतो. मी रोज सकाळी १०.३० वा चे सुमारास माझे गिरणीवर जातो व दुपारी जेवण करणेसाटी दुपारी ०३.०० वा चे सुमारास घरी परत येतो व जेवण करून पुन्हा सायंकाळी ०६.०० वा चे सुमारास माझे गिरणीवर जावुन रात्री १०.०० वा चे सुमारास घरी परत येत असतो.

दिनांक २३/१०/२०२४ रोजी मी नेहमीप्रमाणे सकाळी ११.०० वा चे सुमारास माझे गिरणीवर गेलो तेव्हा आमचे बिल्डींगचे टेरेसवर असलेल्या दोन पाण्यांचे टाकी वरील लोखंडी झाकणे ही सुस्थितीत होते. दुपार पर्यंत गिरणीवर काम करून दुपारी ०३.०० वा चे सुमारास जेवण करण्यासाठी घरी आलो. घरी आल्यावर माझे आईने मला सांगितले की, अपने बिल्डींग के टेरेस पर जो पाणी का दो टंकी है. वो दोनो टंकी के उपर वाला ढक्कन चोरी हो गया है असे सांगितले. करीता मी लागलीच आमचे बिल्डींगचे टेरेसवर जावुन पाहिले असता मला आमचे बिल्डींगचे टेरेसवर असलेल्या दोन पाण्याचे टाकी वरील दोन लोखंडी झाकणे ही दिसली नाहीत. करीता मी आमचे बिल्डींग मध्ये राहणा—या सर्व रहिवाशांना बिल्डींग मधील कोणी रहिवाशांनी सदरचे पाण्याचे टाकी वरील लोखंडी झाकण काढले आहे का याबाबत चौकशी केली परंतु आमचे बिल्डींग मधील रहिवाशांनी सदरची झाकणे काढली नसल्याचे मला कळविले. तेव्हा मी सदर लोखंडी झाकणांचा आमचे बिल्डींगचे आजुबाजुचे परिसरात शोध घेतला परंतु मला सदरची लोखंडी झाकणे ही मिळुन आले नाहीत. करीता मी लागलीच त्याच वेळेस डायल ११२ या क्रमांकावर फोंन करून त्यांना सदरची माहिती देवुन पोलीस मदत मागिवली होती. मी मदत मागितल्यानंतर काही वेळातच दोन पोलीस आमचे बिल्डींग जवळ आले. तेव्हा पोलीसांनी देखील सदर ठिकाणाची पाहणी केली असता त्यांना देखील आमचे बिल्डींगचे टेरेसवर असलेल्या दोन पाण्याचे टाकीं वरचे दोन लोखंडी झाकण हे नसल्याचे दिसुन आले होते. त्यानंतर पोलीसांनी मला सदर बाबत तक्रार देणेसाठी लागलीच पोलीस स्टेशनला येणे बाबत कळविले. परंतु त्या वेळेस मला अचानक माझी खाजगी महत्त्वाची कामे असल्याने मी पोलीस ठाण्यात येवु शकलो नाही. तसेच त्यानंतर पासुन आज रोजी पावेतो मी माझे वैयक्तिक कामानिमित्त बाहेरगांवी गेलो असल्याने व बाहेरगांवाहुन आज रोजी परत माझे घरी उल्हासनगर येथे आल्याने आज रोजी सदर बाबतची तक्रार देणेसाठी पोलीस ठाण्यात आलो आहे. आमचे बिल्डींगचे टेरेस वरती असलेंल्या दोन पाण्याचे टाकी वरील चोरीस गेलेल्या लोखंडी झाकणांचे वर्णन खालील प्रमाणे.

१) ५५००/— रू किंमतीचे पाण्याचे टाकीवर लावण्यात आलेले दोन लोखंडी झाकणे जु.वा.कि.सु.

——————————

५५००/— रू एकुण

——————————

तरी दि. २३/१०/२०२४ रोजी ११.०० वा ते १५.०० वाजताचे सुमारास मी राहत असलेल्या मुस्कान पॅलेस रूम नंबर १०१, सेक्शन २५ महावीर हॉस्पिटल रोड, उल्हासनगर ४ जि. ठाणे या बिल्डींगचे टेरेस वरील पाण्याचे टाकीवर असलेले वरील वर्णनाचे व किंमतीचे दोन लोखंडी झाकणे ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने माझ्या संमती शिवाय लबाडीने चोरी केली आहेत म्हणुन माझी त्या अज्ञात चोरटया विरूध्द तक्रार आहे.

माझी वरिल फिर्याद पोलीसांनी कॉम्प्यूटरवर मराठीतुन टाईप केली असुन ती मी वाचून पाहिली. ती माझ्या सांगण्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हि फिर्याद लिहून दिली.

पोलीस ठाणे अंमलदार
विठ्ठलवाडी पो. स्टे. उल्हासनगर